सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ८४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ८ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## राज्याचा निकाल ९२.०९ टक्के, कोकण विभाग पुन्हा अव्वल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च महिन्यात घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा (डडउ) निकाल आज अधिकृतपणे जाहीर केला. यंदा राज्याचा एकूण निकाल ९२.०९ टक्के लागला असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही निकालाच्या शर्यतीत मुलींनीच बाजी मारली आहे. राज्यातील एकूण १४ लाख २० हजार ४८६ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून, अनेक विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

मंडळाने सुरुवातीला दुपारी १ वाजता निकाल ऑनलाईन पाहता येईल असे जाहीर केले




होते. मात्र, ऐनवेळी संकेतस्थळावर (वेबसाईट) वाढणारे ट्रॅफिक आणि विद्यार्थ्यांची उत्सुकता लक्षात घेता, मंडळाने तातडीचा निर्णय घेत सकाळी ११:३० वाजल्यापासूनच निकाल पाहण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, अशी माहिती त्रिगुण कुलकर्णी यांनी दिली.

पुढील प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळावा, या उद्देशाने यंदा बोर्डाने परीक्षा १० दिवस आधीच घेतली होती.

### असा आहे विभागानुसार निकाल

| | |
|---|---|
| कोकण | : ९७.६२ टक्के |
| कोल्हापूर | : ९५.४७ टक्के |
| मुंबई | : ९४.९७ टक्के |
| पुणे | : ९४.२४ टक्के |
| नाशिक | : ९०.५३ टक्के |
| अमरावती | : ९०.५० टक्के |
| नागपूर | : ८९.०७ टक्के |
| लातूर | : ८८.४२ टक्के |
| छत्रपती संभाजीनगर | : ८८.४१ टक्के |

संपूर्ण राज्यात अत्यंत निकोप आणि शिस्तबद्ध वातावरणात ही परीक्षा पार पडली. राज्यातील लाखो पालकांचे आणि विद्यार्थ्यांचे लक्ष लागून राहिलेल्या या निकालाने आता अकरावी प्रवेशाचा मार्ग मोकळा केला आहे.



मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९४.९६ टक्के असून मुलांचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे. मुलांच्या तुलनेत मुलींचा निकाल ५.४० टक्क्यांनी अधिक लागला आहे.विभागावार निकालात ९७.६२ टक्क्यांसह कोकण विभागाने पुन्हा एकदा राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.राज्यातील सर्वात कमी निकाल छत्रपती संभाजीनगर विभागाचा (८८.४१ टक्के) लागला आहे.

## पश्चिम बंगालमध्ये सुवेंदु अधिकारी मुख्यमंत्री होणार

### उद्या सकाळी ११ वाजता होणार शपथविधी

### दोन उपमुख्यमंत्री ही करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८कोलकाता–** पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठा बदल झाला असून, राज्याचे नवीन मुख्यमंत्री म्हणून सुवेंदु अधिकारी यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. सुवेंदु अधिकारी केवळ मुख्यमंत्रीच होणार नाहीत, तर महत्त्वाचे असे गृह मंत्रालय देखील स्वतःकडे ठेवणार आहेत. यासोबतच राज्यात दोन उपमुख्यमंत्री असतील, ज्यामध्ये प्रसिद्ध अभिनेत्री आणि नेत्या रूपा गांगुली यांचे नाव निश्चित झाल्याचे समजते आहे.

मंत्रिमंडळात समतोल राखण्यासाठी भाजपने दोन उपमुख्यमंत्र्यांचा फॉर्म्युला निवडला आहे. रूपा गांगुली यांच्यासोबतच दुसरा उपमुख्यमंत्री उत्तर बंगालमधील (दार्जिलिंग परिसर) पुरुष लोकप्रतिनिधी असेल.



### शपथविधीची जय्यत तयारी

कोलकाता येथील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राऊंडवर शपथविधी सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. माजी केंद्रीय मंत्री सुभाष सरकार यांनी दिलेल्या माहितीनुसार, पावसामुळे अडथळे आले असले तरी सर्व व्यवस्था चोख करण्यात आली आहे. या सोहळ्यासाठी देशभरातील विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि केंद्रातील दिग्गज मंत्री कोलकाता येथे दाखल होत आहेत.

सुवेंदु अधिकारी यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा भवानीपूर मतदारसंघात पराभव केला आहे. यापूर्वी २०२१ मध्ये त्यांनी नंदीग्राममध्येही ममता बॅनर्जींना हरवले होते, आता सलग दुसऱ्यांदा त्यांनी हा पराक्रम गाजवला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या पश्चिम बंगाल दौऱ्यावर असून, शुक्रवारी त्यांचे कोलकात्यात आगमन झाले. विमानतळावरून ते थेट नोवोटेल हॉटेल येथे पोहोचले. त्यांच्यासोबत सुवेंदु अधिकारी, दिलीप घोष आणि समिक भट्टाचार्य हे भाजपचे महत्त्वाचे नेते देखील उपस्थित होते. बंगालमधील सत्तास्थापनेच्या ऐतिहासिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शाह यांचा हा दौरा अत्यंत निर्णायक मानला जात आहे.

## राज्यपालांनी ११८ मागितले, विजयने जमविले...!

### गाठला बहुमताचा आकडा, त्रिशंकू विधानसभेचा पेच सुटला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८तिरुवनंतपुरम/पुद्दुचेरी –** सत्तास्थापनेसाठी दोन वेळा जाऊनही राज्यपालांनी थलापती विजयला ११८ आमदारांच्या सह्या आणण्यास सांगत मुख्यमंत्री पदाचा शपथविधी घेण्यास नकार दिला होता. यातच डीएमके आणि एआयडीएमकेने युती करत सत्ता स्थापनेच्या चर्चा सुरु केल्या होत्या. दोन एकमेकांचे विरोधी पक्ष सत्तेत कसे येणार असा प्रश्न उपस्थित होत असतानाच विजयने बहुमताचा आकडा जुळविला आहे.

तामिळनाडूच्या राजकारणातील सस्पेन्स अखेर संपला आहे. अभिनेता विजय यांच्या 'तमिलगा वेत्री कळघम' पक्षाला बहुमतासाठी आवश्यक असलेले संख्याबळ मिळाले असून, विजय यांचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. वामपंथी पक्ष (उझख, उझच्) आणि विदुथलाई चिरुथैगल काची (तउघ) यांनी



विजयला पाठिंबा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याने तामिळनाडूच्या सत्तेची गणिते आता स्पष्ट झाली आहेत.तामिळनाडू विधानसभेत बहुमतासाठी ११८ जागांची आवश्यकता आहे. विजय यांच्याकडे आता एकूण ११९ आमदारांचे संख्याबळ झाले आहे.

पट्टिनपक्कम येथील विजय यांच्या निवासस्थानी आधारव अर्जुन यांनी भेट घेतली असून, तिथेच पाठिंब्याबाबतची अंतिम चर्चा झाल्याचे समजते. उझख च्या कार्यकारिणी बैठकीत आणि उझच् च्या राज्य समितीच्या बैठकीत ढतघ ला समर्थन देण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. आज सायंकाळी ४:३० वाजता सर्व घटक पक्षांच्या नेत्यांची संयुक्त पत्रकार परिषद होणार असून, त्यात औपचारिक घोषणा केली जाईल.

## 'कॉर्पोरेट जिहाद'चा मास्टरमाइंड संभाजीनगरात

### इम्तियाज जलील यांची चौकशी करा, मंत्री संजय शिरसाट यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८संभाजी नगर**
टीसीएसमध्ये घडलेल्या कार्पोरेट जिहाद प्रकरणातील आरोपी निदा खानला निदा खानला एमआयएम चा सपोर्ट आहे. या प्रकरणाचा मास्टरमाइंड छत्रपती संभाजीनगरमध्ये आहे. या प्रकरणी इम्तियाज जलील यांची चौकशी करावी, अशी मागणी शुक्रवारी मंत्री संजय शिरसाट यांनी केली. ते धाराशिवमध्ये बोलत होते.

इम्तियाज जलील यांच्या चौकशीतून एक मोठे षड्यंत्र महाराष्ट्राला पाहायला मिळेल. निदा खान आणि त्यांच्या सोबतच्या लोकांना जलील जाहीर पाठिंबा देतात. या सर्वांची बाजू घेऊन जलील यांना काय



घडवायचे होते? ही लोकांच्या मनात शंका आहे. नाशिकची निदा खान संभाजीनगरमध्येच का आली? कॉर्पोरेट जिहादचे मास्टरमाइंड हे नक्कीच संभाजीनगरमध्ये आहेत म्हणून ती महिला शहरात आली, असा आरोपही शिरसाट यांनी केला.

संजय शिरसाट म्हणाले की, धर्मांतर करणे, मुलींना फसवणे हे एमआयएमच्या महाशयांच्या नेतृत्वात होतात. निदा खान ही एक केवळ मोहरा आहे. त्यांचे जाळे महाराष्ट्रभर पसरलेले आहे. आपल्याला हे प्रकार नगर, पुणे आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये पाहायला मिळतील, हे विष पसरवले जात आहे. हिंदूचा द्वेष करणे, त्यांचे धर्मांतर करणे या प्रकरणामुळे समाजात चीड निर्माण होऊ लागली आहे. कालचे प्रकरण सुद्धा त्याच प्रकारचे होते. आता निदा खानला अटक करण्यात आली असून त्यामागे नेमके काय आहे हे समोर येईलच. पण या प्रकरणी एसआयटी चौकशी करण्यात यावी ही मागणी मी मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचे शिरसाट म्हणालेत.

## इम्तियाज जलील यांच्याकडून निदा खानची पाठराखण:पोलिसांना सहकार्य करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८संभाजी नगर**
एमआयएमचे नेते तथा माजी खासदार इम्तियाज जलील यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा नाशिक टीसीएस धर्मांतर प्रकरणातील संशयित आरोपी निदा खान हिची पाठराखण केली. प्रस्तुत प्रकरणातील मुलीने आम्हाला संपूर्ण वस्तुस्थिती सांगितली. मी स्वतः एफआयआर वाचला. त्यात विशेष असे काहीच नाही. मी यापूर्वीच सदर तरुणीला तुझ्याकडून काही चूक झाली असेल, तर मी तुझ्यासोबत उभा राहणार नाही असे सांगितले आहे. पण या प्रकरणात तिने जे सांगितले त्यानुसार सर्वकाही झाले असेल, तर मी तिच्यासोबत प्रामाणिकपणे पूर्ण ताकदीने उभा राहीन, असे ते



म्हणालेत. जलील यांनी यावेळी मंत्री संजय शिरसाट यांना आपण काडीचाही भाव देत नसल्याचेही निक्षुण सांगितले.

टीसीएस प्रकरणातील आरोपी निदा खान हिला गुरुवारी रात्री छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली. ती एमआयएमच्या एका स्थानिक नगरसेवकाने खरेदी केलेल्या घरात राहत होती. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांनी शुक्रवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना या प्रकरणाचा संबंध थेट इम्तियाज जलील यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पत्रकारांनी जलील यांना छेडले असता आपण मंत्री संजय शिरसाट यांच्या आरोपांना काडीमात्र भाव देत नसल्याचे नमूद करत प्रस्तुत प्रकरणात आपण पोलिसांना सहकार्य करत असल्याचे स्पष्ट केले.इम्तियाज जलील म्हणाले, एखाद्या व्यक्तीवर आरोप झाल्यानंतर ती व्यक्ती त्याच्यावरील आरोप कोर्टात सिद्ध होईपर्यंत निर्दोष असते. हा कायद्याचा नियम आहे. म्हणजे माझ्यावर कुणीतरी आरोप केला, तर मी दोषी किंवा गुन्हेगार ठरत नाही. अशा प्रकारचे आरोप होतच असतात. पण मला विश्वास आहे की, या प्रकरणात नाशिक पोलिस नियमाप्रमाणे करतील. सदर तरुणीला (निदा खान) किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला कोर्टात जाऊन जामीन मागण्याचा अधिकार आहे. ही कायदेशीर तरतूद आहे. जामीन याचिका सेशन कोर्टात रिजेक्ट झाली, तरीही व्यक्ती दोषी ठरत नाही. त्याच्याकडे वरच्या कोर्टात जाण्याचा अधिकार असतो.

### लपण्यासाठी निवडलं होत खास लोकेशन

निदा खानने अटकेपासून वाचण्यासाठी छत्रपती संभाजीनगरमधील नारेगाव परिसरातील कौसर कॉलनी निवडली होती. हे लोकेशन इतकं खास होतं की, ज्या इमारतीत ती लपली होती, तिच्या आजूबाजूला लांबलांबपर्यंत एकही घर नव्हतं. वर्दळ नसलेला आणि निर्जन भाग असल्याने कोणाला संशय येण्याची शक्यताच नव्हती. निदाला वाटले होते की या एकाकी भागात ती पोलिसांच्या नजरेतून सुरक्षित राहील, मात्र पोलिसांनी तिचा हा भ्रम तोडला.

## सुनेत्रा पवारांच्या मुख्यमंत्रीपदावर सुप्रिया सुळेंची पहिली प्रतिक्रिया

## म्हणाल्या – तर पहिला हार मीच घालेन; ऑपरेशन तुतारीवरही भाष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई–** सुनेत्रा पवार जर मुख्यमंत्री झाल्या तर त्यांना पहिला हार मी घालेन, या खासदार सुप्रिया सुळे यांच्या वक्तव्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जय पवार यांनी २०२९ मध्ये सुनेत्रा पवार मुख्यमंत्री व्हाव्यात, अशी बारामतीकरांची इच्छा असल्याचे विधान केल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी पहिल्यांदाच यावर प्रतिक्रिया दिली. त्यांच्या या विधानामुळे पवार कुटुंबातील राजकीय समीकरणांबाबत विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.जय पवार यांनी काही दिवसांपूर्वी बोलताना २०२९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर सुनेत्रा पवार राज्याच्या मुख्यमंत्रीपदी पाहण्याची इच्छा बारामतीतील अनेक कार्यकर्त्यांची असल्याचे म्हटले होते. या विधानानंतर राज्यभरात राजकीय चर्चा रंगल्या होत्या. त्यावर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे यांनी अत्यंत संयत भूमिका घेतली. त्या म्हणाल्या, सुनेत्रा पवार मुख्यमंत्री झाल्या तर त्यांना




पहिला हार मी घालेन. तसेच २०२९ मध्ये कोण कोणत्या पक्षात असेल, हे त्या वेळेलाच स्पष्ट होईल, असे सूचक वक्तव्यही त्यांनी केले.

दरम्यान, राज्याच्या राजकारणात सध्या चर्चेत असलेल्या ऑपरेशन तुतारी, या मुद्द्यावरही सुप्रिया सुळे यांनी भाष्य केले. मी निवडून आल्यापासून ऑपरेशन तुतारीच्या चर्चा ऐकत आहे. अनेक वर्षांपासून या गोष्टी सुरू आहेत. आम्ही स्वाभिमानी मराठी माणसं आहोत. आमची कोणतीही भानगड नाही. लोकांनी आम्हाला संधी दिली आहे आणि त्या विश्वासाचा मान ठेवून आम्ही काम करत आहोत, असे त्या म्हणाल्या. सत्तेत असो किंवा नसो, लोकांसाठी काम सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. राजकारणात तोडाफोडीच्या घडामोडींवर बोलताना सुप्रिया सुळे यांनी अशा राजकारणात आता काही नवीन राहिले नसल्याचे म्हटले. तोडून-फोडून सत्ता मिळवण्याच्या गोष्टी आता जुन्या झाल्या आहेत. लोकांना विकास आणि काम हवे आहे, असे त्या म्हणाल्या. तसेच जनतेने दिलेल्या संधीचा आदर करत सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न कायम राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**संपादकीय ......**

# नियोजनशून्यतेला टँकरची ठिगळपट्टी

मे महिन्याच्या उन्हाने यंदा जमिनीबरोबर राज्याच्या कारभारातील पोकळ दाव्यांनाही चटके दिले आहेत. एकीकडे उष्णतेची लाट अंग भाजत आहे, तर दुसरीकडे महाराष्ट्रातील हजारो गावांची तहान आता आकाशाकडे नाही, तर टँकरच्या चाकांकडे लागली आहे. राज्यातील सुमारे १६०० गावे आणि वाड्यावस्त्यांना तब्बल ४६६ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे, ही बाब राज्याच्या जलव्यवस्थापनाच्या अपयशाची जाहीर कबुली आहे. धरणांतील पाणीसाठा ३७ टक्क्यांवर येऊन ठेपला आहे आणि कोयना धरणासारख्या राज्याच्या ऊर्जा-नाडीतील जलसाठाही चतुर्थांशावर आल्याने परिस्थिती किती गंभीर आहे, याची जाणीव होते. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात पाण्यासाठी गावोगावी टँकर धावणे हे अनेक दशकांच्या दुर्लक्षाचे, राजकीय बेफिकीरीचे आणि नियोजनशून्य विकासाचे फलित आहे.

महाराष्ट्रात दरवर्षी पाऊस पडतो, पण तो साठवला जात नाही. निसर्ग पाणी देण्यात कंजूष नाही; मात्र शासन ते जपण्यात अपयशी ठरले आहे. राज्यातील अनेक भागांत सरासरीपेक्षा चांगला पाऊस होऊनही उन्हाळा आला की पाणीटंचाईचे संकट उभे ठाकते. कारण पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्याऐवजी ते वाहून जाऊ दिले जाते. जलसंधारणाच्या योजना कागदांवर रंगवल्या जातात; प्रत्यक्षात मात्र तलाव गाळाने भरलेले, नाले अतिक्रमणांनी बुजलेले आणि विहिरी कोरड्या पडलेल्या दिसतात. 'जलयुक्त शिवार'सारख्या योजनांचे मोठा गाजावाजा झाला, हजारो कोटी रुपये खर्च झाल्याचे दावे झाले; पण आजही मराठवाडा, विदर्भ, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक गावे टँकरवर अवलंबून असतील, तर त्या योजनांची परिणामकारकता प्रश्नांकित ठरते.

पाणीटंचाईचे मूळ केवळ कमी पावसात नाही, तर पाण्याच्या अन्याय्य आणि बेजबाबदार वापरातही आहे. महाराष्ट्रातील उपलब्ध पाण्यापैकी तब्बल ७० ते ८० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते. त्यातही उसासारख्या अतिपाणीखाऊ पिकाला प्राधान्य दिले जाते. मराठवाड्यासारख्या कोरडवाहू भागात ऊस कारखानदारीचा विस्तार हा जलनियोजनाच्या विरोधातील सर्वात मोठा विनोद आहे. एका बाजूला शेतकरी आणि सामान्य नागरिक पाण्यासाठी वणवण फिरत असताना दुसर्या बाजूला राजकीय पाठबळ असलेल्या साखर कारखान्यांना मुबलक पाणी उपलब्ध करून दिले जाते. पाण्याचे हे राजकारणच आजच्या संकटाला कारणीभूत ठरले आहे. पाणी हे जीवनाचे साधन राहिले नसून सत्ता आणि पैशाचे हत्यार बनले आहे. शहरांतील परिस्थितीही फार वेगळी नाही. नागरीकरणाच्या वाढत्या वेगाने पाण्याची मागणी प्रचंड वाढली; पण त्या प्रमाणात जलस्रोत निर्माण झाले नाहीत.

महानगरांमध्ये पाईपलाईनमधून होणारी पाण्याची गळती, अनधिकृत वापर आणि असमान वितरण यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जाते. काही शहरांत दररोज लाखो लिटर पाणी गळतीमुळे नाल्यात जाते, तर उपनगरांतील नागरिकांना आठवड्यातून एकदा पाणी मिळते. पाणीपुरवठा हा मूलभूत हक्क असताना तो आज नशिबाचा खेळ ठरत चालला आहे. राज्य सरकारकडून दरवर्षी उन्हाळ्यापूर्वी जलआराखड्यांचे दावे केले जातात. बैठकांमध्ये सादरीकरणे होतात, अधिकार्यांच्या फेरफटक्यांचे फोटो प्रसिद्ध होतात; पण उन्हाळा सुरू झाला की पुन्हा टँकर, दुष्काळ आणि तहान यांचीच पुनरावृत्ती दिसते. प्रशासनाचे नियोजन इतके कमकुवत आहे की, एप्रिलच्या चौथ्या आठवड्यात ३२१ असलेले टँकर काही दिवसांतच ४६६ वर जातात आणि सरकारला त्याचे आश्चर्य वाटते. हवामान बदल, उष्णतेच्या लाटा आणि कमी होणारे जलसाठे यांची माहिती आधीपासून असताना सरकारने पूर्वतयारी का केली नाही? जलसंकट हे अचानक कोसळलेले वादळ नाही; ते हळूहळू वाढणारे संकट आहे. तरीही प्रत्येक वर्षी शासनाची धावपळ शेवटच्या क्षणीच का सुरू होते?

पाणीपुरवठा विभागाच्या योजना अनेकदा घोषणांपुरत्याच मर्यादित राहतात. ग्रामीण भागात पाईपलाईन टाकल्या जातात; पण त्यात पाणीच नसते. कोट्यवधींच्या योजनांचे भूमिपूजन होते; पण त्या पूर्णत्वाला जात नाहीत. काही ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प उभे राहतात; पण वीजेअभावी बंद पडतात. गावागावांत नळजोडण्या दिल्याचा गाजावाजा होतो; मात्र नळातून पाणी येत नसल्याने महिलांना पुन्हा विहिरींवर रांगा लावाव्या लागतात. 'हर घर जल'च्या घोषणा वास्तवाच्या धुळीत हरवतात. योजनांचा केंद्रबिंदू लोकांचा पाणीहक्क नसून ठेकेदारी आणि राजकीय प्रसिद्धी बनल्याने हा प्रश्न अधिक बिकट झाला आहे. याहूनही गंभीर बाब म्हणजे पाण्याच्या प्रश्नाकडे अजूनही आपत्कालीन समस्येप्रमाणे पाहिले जाते; दीर्घकालीन धोरण म्हणून नाही. टँकर पाठवणे हा उपाय असू शकतो, पण ते उत्तर नाही. टँकर म्हणजे प्रशासनाच्या अपयशावर मारलेली तात्पुरती फुंकर.पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवण्यासाठी जलसंधारण, भूजल पुनर्भरण, नदीजोड प्रकल्पांचे वैज्ञानिक पुनर्मूल्यांकन, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पीकपद्धतीतील बदल या सर्व बाबींवर कठोर निर्णय घ्यावे लागतील. ग्रामीण भागात छोटे बंधारे, शेततळी आणि पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन याला प्राधान्य द्यावे लागेल. शहरांमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी लागेल. सांडपाण्याची पुनर्प्रक्रिया करून औद्योगिक वापरासाठी त्याचा पुनर्वापर वाढवणे अत्यावश्यक आहे. भविष्यातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे हवामान बदल. महाराष्ट्रात पावसाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. कमी दिवसांत अतिवृष्टी आणि उर्वरित काळात दीर्घ कोरडेपणा, हे नवीन वास्तव बनत आहे. त्यामुळे पारंपरिक जलनियोजन आता पुरेसे राहणार नाही. जलव्यवस्थापनाला हवामान बदलाच्या संदर्भात नव्याने आकार द्यावा लागेल. जलस्रोतांचे डिजिटल मॅपिंग, भूजल पातळीचे रिअल-टाईम निरीक्षण, जलवापराचे नियमन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार देणे, या गोष्टी काळाची गरज बनल्या आहेत.

# महानगरपालिकेच्या विविध विभागांची आयुक्त वर्षा लड्ढा यांच्याकडून कार्यालयीन कामकाजाची पाहणी

## प्रशासकीय कार्यपद्धती, स्वच्छता आणि प्रलंबित कामांवर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्ढा यांनी आज महानगरपालिका मुख्यालयातील नगर रचना विभाग, बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता-१, प्रकाश विभाग, प्रधानमंत्री आवास योजना विभाग, आरोग्य विभाग, स्वच्छता विभाग, उद्यान विभाग, पशु विभाग, विधी विभाग, अभिलेखागार विभाग, लेखा विभाग, अतिरिक्त आयुक्त कार्यालय, उपायुक्त कार्यालय, कॅश विभाग, जन्म-मृत्यु विभाग, संगणक विभाग, जनसंपर्क विभाग, सामान्य प्रशासन विभाग, नगरसचिव भांडार विभाग, निवडणूक विभाग, कर विभाग या विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून कार्यालयीन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी विविध विभागांतील प्रशासकीय कार्यपद्धती, प्रलंबित कामे, फाईल व्यवस्थापन तसेच कार्यालयीन शिस्त यांची तपासणी करण्यात आली.पाहणीदरम्यान आयुक्तांनी विभागनिहाय सुरू असलेल्या कामांची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. कार्यालयीन कामकाज वेळेत पूर्ण व्हावे, फाईलची अनावश्यक प्रलंबितता राहू नये तसेच विभागांमध्ये समन्वय राखून कामकाज अधिक कार्यक्षम पद्धतीने राबविण्याचे



निर्देश त्यांनी दिले.यावेळी कार्यालयीन स्वच्छता, उपस्थिती नोंदवही, दस्तऐवजांची जपणूक, संगणकीय कामकाज आणि प्रशासकीय नोंदी यांची तपासणी करण्यात आली. काही विभागांमध्ये सुधारणा करण्याबाबतही आयुक्तांनी सूचना दिल्या. कार्यालय परिसर स्वच्छ, शिस्तबद्ध आणि व्यवस्थित ठेवण्यावर त्यांनी विशेष भर दिला.तसेच विविध विभाग प्रमुखांकडून प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला. शहरातील सुरू असलेली विकासकामे, प्रशासकीय प्रक्रिया आणि आगामी प्रकल्पांच्या तयारीबाबत माहिती घेत कामांमध्ये गती आणण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना करण्यात आल्या. महानगरपालिकेच्या कामकाजात अधिक पारदर्शकता, शिस्त आणि कार्यक्षमता आणण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे आयुक्त वर्षा लड्ढा यांनी यावेळी सांगितले. सर्व विभागांनी समन्वय राखून प्रभावीपणे काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखा परिक्षक श्यामसुंदर देव, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, श्रीकांतसिंह चौव्हान, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, नगरसचिव संदिप वडुरकर, पशुशल्य चिकीत्सक डॉ. सचिन बोंद्रे, भांडार अधिक्षक मंगेश जाधव, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे तसेच महानगरपालिकेचे विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सुसंस्कार शिबिर ही आजच्या काळाची खरी गरज

## डॉ. रघुनाथ वाडेकर : गुरुकुंजात सुसंस्कार शिबिराचे उद्घाटन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८तिवसा-** आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगात मुलांमध्ये वाढती असंवेदनशीलता, मोबाईलचे व्यसन व नैतिक मूल्यांचा होत असलेला ऱ्हास ही गंभीर चिंतेची बाब बनली आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार, शिस्त, सामाजिक बांधीलकी आणि राष्ट्रप्रेम जागृत करण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, यांनी लिहिलेल्या ग्रामगीता तत्त्वज्ञान प्रणालीनुसार धकाधकीच्या जीवनात विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार निर्माण व्हावे, याकरिता शिबिरांची नितांत आवश्यकता आहे, असे प्रतिपादन वाडेकर नॅशनल स्कूलचे संचालक डॉ. रघुनाथ वाडेकर यांनी केले. ते गुरुकुंज मोझरी येथे आयोजित करण्यात आलेल्या सुसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पुढे बोलताना म्हणाले की, आधुनिक शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना नैतिकमूल्यांचे शिक्षण मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ गुण आणि स्पर्धा यावर भर देऊन चालणार नाही, तर मुलांच्या मनात माणुसकी, संवेदनशीलता व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. सुसंस्कार शिबिरांमधून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सकारात्मक विचार आणि जीवनाकडे पाहण्याचा योग्य दृष्टिकोन विकसित होतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले. शिबिरामध्ये योग व प्राणायाम, प्रार्थना, व्यक्तिमत्त्व विकास, प्रेरणादायी कथा, सांस्कृतिक कार्यक्रम, समूहचर्चा तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोबाईल आणि सोशल मीडियाच्या अतिरेकापासून दूर ठेवून प्रत्यक्ष संवाद, सहकार्य आणि समूहभावना विकसित करण्यावर भर देण्यात आला. प्रास्ताविक राजेंद्र साबळे यांनी, तर संचालन अजित वाडेकर यांनी केले.

# तापत्या उन्हात वरुड शहरात माणुसकीची पाणपोई

## मनुष्यांसह पशुपक्ष्यांसाठी शीतल जलसेवा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८वरुड,** संत्रानगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वरुड शहरात सध्या उन्हाचा पारा ४५-४६ अंशांवर पोहोचला आहे. रणरणत्या उन्हामुळे नागरिक हैराण झाले असतानाच मुक्या




पशुपक्ष्यांचेही पाण्यासाठी हाल होत आहेत. हीच गरज ओळखून दीपक खंडेलवाल व त्यांच्या मित्रपरिवाराने माणुसकीचे दर्शन घडवत शहरात माणुसकीची पाणपोई म्हणून शीतल जलसेवा सुरू केली आहे. स्व. शिवनारायण खंडेलवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आनंद सांस्कृतिक मंडळ, वरुडच्या वतीने शहरातील मोठा भाजी बाजार परिसरात ही विशेष पाणपोई उभारण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर नगरपरिषद व सामाजिक संस्थांनी पुढाकार घेणे काळाची गरज असून आनंद सांस्कृतिक मंडळाच्या या उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. शहराचा विस्तार पाहता अशा पाणपोईंची संख्या वाढविणे काळाची गरज आहे. वाढत्या उष्णतेमुळे पशुपक्षी दगावण्याची भीती पर्यावरण प्रेमींनी व्यक्त केली आहे. त्यामुळे वरुड नगरपरिषद, स्थानिक सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींनी प्रत्येक चौकात, मंदिरासमोर व सार्वजनिक ठिकाणी अशा पाणपोई उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी आता सर्वसामान्य नागरिक करीत आहेत.

पाणपोई उन्हाळा संपेपर्यंत सुरूच राहणार धगधगत्या उन्हात मनुष्यालाच नव्हे तर पशुपक्षांना सुद्धा शीतल जल प्राप्त व्हावे म्हणून माझ्या वडिलांच्या प्रेरणेतून आम्ही हा छोटासा प्रयत्न सुरू केला आहे. ही पाणपोई उन्हाळा संपेपर्यंत सुरूच राहणार, अशी भावना दीपक खंडेलवाल यांनी व्यक्त केली. पाणपोईची वैशिष्ट्ये केवळ माणसांसाठीच नव्हे, तर सर्व जीवांचा विचार करून या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. येथे वाटसरूंसाठी थंड पाण्याचे मोठे रांजन. गुरांना सहज पाणी पिता येईल, अशी प्लॅस्टिकची टाकी. तर पक्ष्यांसाठी लहान मडक्यां मध्ये दाणा व पाण्याची स्वतंत्र सोय करण्यात आली असल्याचे सामाजिक कार्यकर्ते शेषराव कडू यांनी सांगितले. दाणा-पाणी ठेवा चिवताईसाठी नागरिकांनीही आपापल्या घराच्या गच्चीवर किंवा अंगणात पक्ष्यांसाठी दाणा नाही तर एका वाट्यात पाणी तरी ठेवावे, आपल्या या छोट्याशा उपक्रमातून अनेक पक्षांना दिलासा मिळेल, असे आवाहन सेवानिवृत्त तहसीलदार कमलावर देशमुख यांनी केले आहे.

# महाराष्ट्रात प्रथमच महिला करणार 'मुंडण'

## समग्र शिक्षा आंदोलनाचा ५७ वा दिवस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती-**


राज्यातील समग्र शिक्षा अभियानाचे तीन हजारांवर कंत्राटी कर्मचारी मुंबईत नऊ मार्चपासून आंदोलन करीत आहेत. यापूर्वी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी २० एप्रिल रोजी पुरुषांनी मुंडण आंदोलन केले आहे. आता प्रगतशील महाराष्ट्रात महिला पहिल्यांदाच मुंडण करणार असून ही स्थिती राज्य सरकारने शिक्षण विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांवर आणली असल्याचा आरोप होत आहे. आंदोलनाला बसलेल्या कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर सरकार आंदोलनकर्त्यांची दखल घेणार का? असा प्रश्न आझाद मैदानावर आंदोलनाला बसलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी केला आहे. देशात लाडक्या बहिणी व महिला आरक्षणाचा मुद्दा चर्चेत असताना प्रगतशील महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना आपल्या रास्त मागण्यांसाठी ५६ दिवस उपोषण व इतर आंदोलन करावे लागत आहे. उन्हाच्या तडाख्यात ५६ दिवसांच्या आंदोलनानंतर सुद्धा एकाही मंत्राने दखल घेतली नसल्याने नाइलाजाने कर्मचाऱ्यांनी महिला मुंडण आंदोलनाचा इशारा दिला आहे. सात मे पर्यंत सरकारने नियमित करण्यासंदर्भात ठोस निर्णय न घेतल्यास आठ मे रोजी समग्र शिक्षा अभियानांतर्गत सर्व महिला कर्मचारी मुंडण करणार असल्याचे निवेदन शासनास सादर करण्यात आले आहे. मागील २० ते २५ वर्षांपासून शासनसेवेत कायमच्या प्रतीक्षेत असलेले समग्र शिक्षा अभियानाचे तीन हजारांवर कर्मचारी नऊ मार्चपासून मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण आणि अन्नत्याग आंदोलन करीत आहेत. विशेष म्हणजे समग्र शिक्षा अभियानांतर्गत दिव्यांग विभागातील अर्ध्या कर्मचाऱ्यांना २०२४ मध्ये सेवेत नियमित करण्यात आले. एकाच अभियानातील अर्धे कर्मचारी कायम व सेवाज्येष्ठ कर्मचारी कंत्राटी असल्याने राज्यात असंतोषाचे वातावरण आहे.

# आईस्क्रीमचे अतिसेवन आरोग्यासाठी घातक

## कृत्रिम घटकांमुळे वाढतो आजारांचा धोका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती** उन्हाळ्याचे चटके जाणवू लागताच लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांची पावले आईस्क्रीमच्या दुकानांकडे वळू लागली आहेत. मात्र आईस्क्रीमपासून मिळणारा गोडवा आणि गारवा अतिप्रमाणात सेवन केल्यास आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरू शकत असल्याचे मत आहारतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे आईस्क्रीममध्ये साखर, संतृप्त चरबी आणि कृत्रिम रंग यासारख्या घटकांचे प्रमाण जास्त असते. या घटकांमुळे लठ्ठपणा, हृदयरोग, किडनीचे विकार, अपचन, पोट फुगणे तसेच वारंवार सर्दी-खोकल्याच्या समस्या उद्भवतात. दररोज सेवन केल्यास दीर्घकाळाने आरोग्याशी निगडित समस्या जाणवतात. विशेष म्हणजे आधीपासूनच आरोग्याच्या



समस्यांनी त्रस्त असणाऱ्यांनी आईस्क्रीम खाणे टाळावे, अन्यथा आजारांचा धोका वाढण्याची शक्यता असते. आईस्क्रीम खाताच तोंड आणि घशात तात्पुरता गारवा जाणवतो. त्यामुळे मेंदूला कुलिंग सिग्नल मिळतो, परंतु हा परिणाम तात्पुरता असतो. शरीरात थंड पदार्थ गेल्यानंतर शरीराचे तापमान संतुलित ठेवण्यासाठी शरीर आतून उष्णता निर्माण करण्याचा प्रयत्न करते, अशी प्रक्रिया वारंवार झाल्यास शरीराच्या तापमान नियंत्रण प्रणालीवर हृदयरोग, किडनीचे आजार असणाऱ्यांनी आईस्क्रीम टाळावे.

जास्त साखरेमुळे रक्तातील साखरेचे प्रमाण अचानक वाढू शकते. त्यामुळे आधीपासूनच आरोग्याच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या व्यक्तींवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. याकरिता शक्यतो आईस्क्रीमपासून दूर राहिल्यास शरीरासाठी अधिक चांगले राहील, असे तज्ज्ञांकडून सांगण्यात आले.एखाद्या वेळी आईस्क्रीम सेवन केल्यास काही फरक पडणार नाही, मात्र अतिप्रमाणात सेवन केल्यास आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरू शकते. त्यापेक्षा उन्हाळ्यात मिळणारे खरबूज, टरबूज सेवन केल्यास शरीराला लाभदायक ठरू शकते. **कविता देशमुख** आहारतज्ज्ञ, जिल्हा सामान्य रुग्णालय.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# उन्हाळी परीक्षेच्या पाश्र्वभूमीवर विद्यापीठाचा पुढाकार

# पाचही जिल्हांत 'उष्माघात मदत कक्ष' स्थापन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा सध्या सुरू आहेत. वाढत्या तापमानामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान उष्माघात आणि निर्जलीकरण यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. ही बाब लक्षात घेऊन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्यांमध्ये 'जिल्हास्तरीय उष्माघात मदत कक्ष' स्थापन करण्यात आले आहेत. या उपक्रमाच्या नियोजनासाठी गुरुवारी, ७ मे रोजी विद्यार्थी विकास विभागात एका विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.




> विद्यार्थ्यांचे आरोग्य ही आमची प्राथमिकता आहे. परीक्षेच्या काळात कडक उन्हामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये, यासाठी हा मदत कक्ष अत्यंत प्रभावी ठरेल.
>
> **– कुलगुरू डॉ मिलींद बारहाते**

याप्रसंगी सभेच्या अध्यक्षस्थानी विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर होते. यावेळी उष्माघात जिल्हा समितीचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. अतुल बोडखे, तसेच समितीचे सदस्य डॉ. सावन देशमुख, डॉ. हरिदास आखरे, डॉ. नितीन सराफ, डॉ. राहुल सावरकर, डॉ. शीतल तायडे, प्राचार्य जी. एन. चौधरी आणि रोहन बुंदेले उपस्थित होते.डॉ. राजीव बोरकर यांनी उष्माघात या संकल्पनेची पाश्र्वभूमी आणि त्याचे गांभीर्य विषद केले. तर डॉ. सावन देशमुख व प्राचार्य अतुल बोडखे यांनी उष्माघातापासून बचाव करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.विद्यापीठाने राबविलेल्या या 'विद्यार्थीभिमुख' प्रयोगाबद्दल सर्व स्तरांतून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे आभार मानले जात आहेत. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. शीतल तायडे यांनी केले.

### विद्यार्थ्यांसाठी आरोग्य साहित्याचे वाटप

या अभिनव उपक्रमांतर्गत संत गाडगे बाबा प्रतिष्ठानतर्फे परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी ओआरएस पाकिटे, ग्लुकोज पावडर व इतर प्रथमोपचार साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. दर्यापूर येथील जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के. बोडखे आणि अमरावती ग्रामीण विभागातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व प्राध्यापक या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाणे जप्त

## ८२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत



### दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८धामणगाव रेल्वे** :काशीखेड शेतशिवार परिसरात प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाण्यांची अवैध साठवणूक व विक्रीसाठी वाहतूक केल्याप्रकरणी दत्तापूर पोलिसांनी दोन जणांविरुद्ध विविध कायद्यांअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत ८२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.प्राप्त माहितीनुसार, दत्तापूर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंगदरम्यान पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, काशीखेड शेतशिवारातील कॅनलजवळ दोन व्यक्ती शासनमान्यता नसलेले एचटीबीटी कापूस बियाणे विक्रीसाठी बाळगून आहेत. या माहितीच्या आधारे पोहेकॉ दीपक पंधरे व पोहेकॉ हरीहर वैद्य यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसह पंचांच्या उपस्थितीत घटनास्थळी धाड टाकली.यावेळी दोन संशयित व्यक्ती पोत्यासह बसलेल्या अवस्थेत आढळून आल्या. चौकशीत त्यांनी आपली नावे मनोज पुरुषोत्तम भोगे (वय ४९, रा. जळगाव आर्वी, ता. धामणगाव रेल्वे) व मोहन निळकंठ अर्मळ (वय ४०, रा. कौडण्यपुर, ता. तिवसा) अशी सांगितली.त्यांच्या ताब्यातील नायलॉन बॅगची पंचासमक्ष तपासणी केली असता ठ-ऊ-ठ ४ऋ क्ध्इठखऊ उजढढजछ डएएऊ्ड नावाचे ५० पॅकेट आढळून आले. प्रत्येकी ४५० ग्रॅम वजनाचे व १६५० रुपये किंमतीचे हे पॅकेट एकूण ८२ हजार ५०० रुपयांचे असल्याचे निष्पन्न झाले. विशेष म्हणजे या पॅकेटवर उत्पादक कंपनीचे नाव, वितरण कंपनीचे नाव तसेच जीईएसी मान्यता क्रमांक नमूद नसल्याचे निदर्शनास आले.सदर बियाणे विक्री अथवा साठवणुकीसाठी आवश्यक परवाना नसल्याची कबुली आरोपींनी दिल्यानंतर पोलिसांनी संपूर्ण मुद्देमाल जप्त केला. तसेच पंचासमक्ष नमुने घेऊन ते तपासणीसाठी नागपूर येथील बियाणे प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत.या प्रकरणी बियाणे निरीक्षक तथा ता. कृषी अधिकारी कार्यालयातील राजेश सदाशिव वाल्दे यांच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३३६(४), ३(५), बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियंत्रण आदेश १९८३, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, महाराष्ट्र कापूस बियाणे अधिनियम २००९ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास दत्तापूर पोलीस करीत आहेत.

# शहरात उद्यालाही राहणार पाणी पुरवठा बंद

**विदर्भ प्रजासत्ताकदि.८अमरावती-** अमरावती शहराला पाणीपुरवठा करणारी अप्पर वर्धा धरणाची मुख्य पाईपलाईन डवरगाव जवळ फुटल्याने गुरुवारी दुपारी १.३० वा. सुमारास हजारो लिटर पाणी अक्षरशः रस्त्यावर वाहून गेले. पाईप लाईन फुटल्याची माहिती मिळताच मजीप्राने निंबोरातील पंप बंद केले. त्यामुळे आताकिमान दोन दिवस म्हणजे शुक्रवार ८ मे आणि शनिवार ९ मे रोजी संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे.१५०० मीमी व्यासाची सिमेंटची पाईप लाईन फुटल्याने जिकडे तिकडे पाणी साचले होते. थकित १८ कोटींच्या बिलासाठी आधीच मजीप्रा कंत्राटदारांचे ठिय्या आंदोलन सुरु असून त्यांनी नवीन कामे न करण्याचा इशारा दिला होता. मात्र उन्हाळ्याचे दिवस पाहता अमरावतीकरांच्या सुविधेसाठी आमचीविनंतीत्यांनीमान्यकेलीवकाम करण्यास होकार दिला. त्यामुळे पाईपलाईन मधील पाणी उपसा केल्यानंतर शुक्रवारला सकाळपासून कामाला सुरुवात करण्यांत आली.मात्र सुमारे १५०० मिमी. व्यासाची मुख्य पाईलाईन असल्यामुळे प्रथम खड्डा खोदणे, लिकेज शोधणे, त्यानुसार साहित्य आणणे व जोडणे आदी कामासाठी किमान दोन दिवसाचा कालावधीलागूशकतो. त्यामुळे शुक्रवार ८ मे आणि शनिवार ९ मे रोजी शहरात पाणीपुरवटा होवू शकणार नाही, अशी माहिती मजिप्राचे उपअभीयंता संजय लेवरकर यांनी दिली.

# उन्हाळी सुट्यांसाठी ५० जादा एसटी बसेस

## मामाच्या गावाला जाण्यासाठी लालपरीचा सुरक्षित प्रवास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती-** राज्य परिवहन महामंडळाच्या अमरावती विभागाने उन्हाळ्यामध्ये प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेता, जादा बसेस चालविण्याचा निर्णय घेतला आहे. १५ एप्रिलपासून अतिरिक्त बस सेवा सुरू झाली असून २६ जूनदरम्यान ५० जादा बसेस धावणार आहेत. त्याचे वेळापत्रकही जाहीर केले आहे.

उन्हाळी सुट्यांमध्ये बसने प्रवासकरणाऱ्यांची संख्या अधिक असते. सुरक्षित प्रवास म्हणून लालपरीकडे पाहले जाते. अनेकजण आपल्या मुलांना उन्हाळी सुट्यांचा आनंद घेण्याठी सहकुटुंब बाहेरगावी जातात. त्यामुळे या काळात बसेसमध्ये प्रवाशांची गर्दी होते. या गर्दीमुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी एसटी महामंडळाने उन्हाळी सुट्यांच्या काळात जिल्ह्यातील काही आगारांमधून ५० जादा बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर,अकोला,यवतमाळ, परतवाडा,दर्यापूर,चांदुर रेल्वे,मोर्शी,वरुड,संभाजी नगर,हिंगोली,परभणी,अकोट या मार्गावर जादा बसेस सोडण्यात येत आहे.बसेसमुळे प्रवाशांचा प्रवास हा अधिक आरामदायी आणि सुखकर होणार आहे. यामुळे उन्हाळी सुट्यांमध्ये एसटी प्रवाशांची सोय झाली आहे.



# पिंक ई-रिक्षातून महिलांना नवी दिशा; १८ जणींच्या हाती रोजगाराचे स्टेअरिंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

जिल्ह्याला 'पिंक ई-रिक्षा' योजनेसाठी ६०० उद्दिष्ट असून याकरिता ६७४ महिलांकडून अर्ज प्राप्त झाले. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेतील समितीने सुमारे ४८१ अर्जांना मंजुरी प्रदान केली असून त्यापैकी केवळ १८ जणांना कर्ज मंजूर झाले आहे. आजघडीला जिल्ह्यात १८ महिलांच्या हाती' पिंक ई-रिक्षा'चे स्टेअरिंग आहे.

महिलांच्या सुरक्षित प्रवासाठी आणि महिलांना हक्काचा रोजगार मिळवून देण्यासाठी ही योजना शासनाने सुरू केलेली आहे. या योजनेसाठी राज्य शासनाकडून २० टक्के अनुदान, ७० टक्के कर्ज आणि १० टक्के स्वहिस्सा भरावा लागतो. त्यानुसार आतापर्यंत ४८१ मंजूर प्रस्तावांपैकी केवळ १८ महिलांनीच 'पिंक ई- रिक्षा' योजनेला लाभघेतला आहे. महिला व बालकल्याण विभागाला जिल्ह्याकरिता ६०० इतके उद्दिष्ट दिले होते. त्यानुसार योजनेच्या लाभासाठी सुमारे ६७४ महिलांनी अर्ज केले. यापैकी ४८१ अर्ज जिल्हास्तरीय समितीने मंजूर केले आहेत. यामधून १८ महिलांनीच ई-पिंक रिक्षा खरेदीकेलेली आहेत. उर्वरित लाभार्थ्यांकडून प्रक्रिया सुरू आहे. १० टक्के स्वहिस्सा रक्कम म्हणजेच ३७ हजार ३०० रुपये भरून रिक्षाची मालकी दिली जाते. उर्वरित २० टक्के म्हणजेच शासनाकडून ७४ हजार ६०० रुपये अनुदान दिले जाते आणि २ लाख ६१ हजार १०३ रुपये कर्ज असे मिळून ई-पिंक रिक्षा ३ लाख ७३ हजार रुपयांत महिलांना उपलब्ध होतो. तत्पूर्वी, ई- पिंक रिक्षासाठी कर्ज घेताना सिबिल स्कोअर किमान ७५० असावा, कर्ज घ्यायचे असल्याने महिलांचे वय ५० च्या आतअसावे, अशाप्रकारचे विविध निकष या योजनेच्या लाभासाठी शासनाने ठरवून दिले आहेत. यासर्व अटींचे पालन करून पिंक ई-रिक्षा महिलांना मिळणार आहेत. शासनाच्या या निर्णयामुळे महिलांना रोजगार मिळाला आहे.विशेष म्हणजे पिंक रिक्षा आता मोठा आधार ठरू पाहत आहे. मात्र, महिलांचे मुख्य गाऱ्हाणे रिक्षाच्या किमतीबाबत आहे. खुल्या बाजारात जी ई-रिक्षा स्वस्त मिळते, तिचीच किंमत या योजनेंतर्गत अधिक असल्याचेबोलले जात आहे. यामुळे अनुदानाचा लाभमिळूनही महिलांवर कर्जाचा बोजा राहतो. त्यामुळे संख्या वाढू शकली नाही.



### तांत्रिक बिघाड येत असल्याच्या तक्रारी

पुरवठा करण्यात आलेल्या काही ई-रिक्षामधील बॅटरीची क्षमता कमी असल्याचे समोर आले आहे. वारंवार होणारे तांत्रिक बिघाड आणि स्पेअर पार्टची अनुपलब्धता यामुळे महिलांना रिक्षा चालविणे कठीण जाते.

ई-पिंक रिक्षा योजनेसाठी आतापर्यंत ६७४ महिलांकडून अर्ज प्राप्त झाले होते. यापैकी ४८१ प्रस्ताव मंजूर झाले आहेत. यामधून आतापर्यंत १८ महिलांनी ई-पिंक रिक्षा खरेदी केलेला आहे. उर्वरित मंजूर प्रस्तावाच्या अनुषंगाने कारवाई सुरू आहे.

**संजय गट,**महिला व बालविकास अधिकारी, अमरावती.

# मणीबाई गुजराती हायस्कूलने ठेवली यशाची परंपरा कायम

### विद्यालयाचा निकाल १००%

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

दी. गुजराती एज्युकेशन सोसायटी, अंबापेठ, अमरावती द्वारा संचालित विदर्भातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या प्रतिष्ठित मणीबाई गुजराती हायस्कूल च्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी/मार्च २०२८ परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.




विद्यालयाने यावर्षी देखील १००% यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा निकाल १००% लागला असून विद्यालयाची विद्यार्थिनी कु. नियती दीपक खवले हिने ९६.२०% गुण प्राप्त करून विद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. तर व्दितीय क्रमांकाची मानकरी कु. ईश्वरी विनोद भोपळे ९४.६०% गुण प्राप्त केले. तृतीय क्रमांकाचे मानकरी अनुक्रमे मा. क्रिश श्रीकृष्ण बांते ९४.४०% कु. भूमिका प्रकाश पुनसे याने ९४.४०% गुण प्राप्त करून ठरले आहे. विद्यालयातून १०७ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत ११४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले असून त्यापैकी एकूण २३ विद्यार्थ्यांनी ९०% व त्या पेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहे.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अंजली देव यांच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनात सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी, पालक वृंद यांच्या एकत्रित प्रयत्नातून हे उज्वल यश प्राप्त झाले असून वर्षभरात राबवलेल्या लेखी परीक्षा, सराव परीक्षा, उजळणी वर्ग इत्यादीचा फायदा विद्यार्थ्यांना झाला आहे. तसेच गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या समस्यांचे निराकरण करून मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थी आणि पालक वर्गाने देखील विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशाचे श्रेय मणीबाई गुजराती हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सौ अंजली देव आणि समस्त शिक्षक वृंदास दिले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल दी गुजराती एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष माननीय श्री. सुरेशभाई राजा, उपाध्यक्ष मा. श्री. निलेशभाई लाठीया, सचिव मा. श्री. हितेंद्रभाई धाबलिया, कोषाध्यक्ष श्री. राजेशभाई पटेल, सहसचिव मा. श्री. तुषारभाई श्रॉफ, आय.पी.पी. मा. श्री. दिलीपभाई पोपट, सर्व कार्यकारिणी सदस्य, मुख्याध्यापिका सौ. अंजली देव, उपमुख्याध्यापक श्री. अनिल पंजाबी, पर्यवेक्षक श्री. प्रवीण सावजी, सौ. सरिता गायकवाड, पर्यवेक्षक श्री. अरविंद हिरपरा, मुख्य लिपिक श्री. कमलेश वस्तानी यांचेसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

# जन्म-मृत्यू दाखल्यांच्या अडचणी लवकरच सुटणार

## उपसंचालक डॉ. कमलापूरकर यांनी घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.८अमरावती –** अमरावती महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू विभागातील कामकाजात येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी पुणे येथील आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. कमलापुरकर यांनी महापालिका आयुक्तांची भेट घेतली.या बैठकीत महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी जुन्या सॉफ्टवेअरमधील नोंदी नवीन 'सीआरएस' पोर्टलवर घेताना येत असलेल्या अडचणी मांडल्या. यामुळे नागरिकांना दाखले मिळण्यास विलंब होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यावर डॉ. कमलापुरकर यांनी माहिती दिली की, केंद्र शासन या नोंदींसाठी लवकरच एक विशेष ॲप सुरू करणार आहे. तोपर्यंत 'ॲड ओल्ड ईव्हेंट' या पर्यायाद्वारे नोंदी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.क्षेत्रीय तसेच, प्रशासकीय झोन स्तरावर जन्म-मृत्यू दाखले मिळण्यासाठी सहायक अधिकाऱ्यांना 'उपनिबंधक' म्हणून मान्यता देण्यात आली आहे. मात्र, त्यांचे युजर आयडी आणि पासवर्ड अद्याप प्राप्त न झाल्याचा मुद्दाही यावेळी उपस्थित करण्यात आला. आयुक्तांनी या तांत्रिक बाबी राज्य स्तरावरून तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. या बैठकीला डॉ. कमलापुरकर, मनपा आयुक्त वर्षा लड्डा आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांची प्रमुख उपस्थिती होती



# स्वस्त धान्य दुकानचालकांवर उपासमारीची वेळ

## कमिशन थकीत, ई-पॉस व केवायसीच्या अडचणींमुळे दुकानदार त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती** अमरावती तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानचालक आर्थिक अडचणीत सापडले असून मागील सहा महिन्यांपासून कमिशन थकीत असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

जानेवारी ते मार्च, या कालावधीत धान्य वितरणाचे काम पूर्ण करूनही अद्याप कमिशन न मिळाल्याने दुकानदारांमध्ये तीव्र नाराजी आहे. शासनाने मोफत धान्य वाटपाचे मार्जिन १५० वरून १७० रुपये प्रति क्विंटल करण्याची घोषणा केली होती. मात्र, प्रत्यक्ष आलबजावणी अद्याप न झाल्याने दुकानदारांना कोणताही दिलासा मिळालेला नाही. रेशन दुकानदारांकडून अनेक प्रकारची अतिरिक्त ऑनलाइन व प्रशासकीय कामे करून घेतली जात आहेत. मात्र या कामांसाठी स्वतंत्र मानधन किंवा कर्मचारी साहाय्य उपलब्ध नाही. यामध्ये सर्व ऑनलाइन नोंदी व बदल, हमीपत्र भरून घेणे, कार्डधारकांच्या नोंदींची तपासणी व अद्ययावत करणे, मृत्यू नोंदीनुसार नावे कमी करणे, विवाहानंतर किंवा स्थलांतरानंतर नावे जोडणे व कमी करणे, कार्ड हस्तांतरण प्रक्रिया यासर्व कामांमुळे दुकानदारांवर मोठा प्रशासकीय ताण येत असून आर्थिक मोबदला मात्र मिळत नसल्याचा त्यांचा आरोप आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास स्वस्त धान्य दुकानचालकांनी व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. योग्य उपाययोजना न झाल्यास धान्य वितरण व्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.



### ई-पॉस व बायोमेट्रिक प्रणालीतील अडचणी

२०१५ पासून रेशन दुकाने ई-पॉस व बायोमेट्रिक प्रणालीवर चालवली जात आहेत. लाभार्थ्यांचा अंगठा पडल्याशिवाय धान्य वितरण व कमिशन नोंद होत नाही. मात्र या प्रणालीत वारंवार तांत्रिक त्रुटी व बदल होत असल्याने वितरण प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत.

## घरकुल कामांना वेग;

# एका महिन्यात FTO पूर्ण करण्याचे सीईओ सत्यम गांधी यांचे निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती** अमरावती जिल्हा परिषदेत प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. बैठकीत प्रलंबित घरकुले, टप्पा-२ मधील कामे व लाभार्थ्यांच्या अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. एका महिन्यात सर्व ऋढ्ज पूर्ण करण्याचे निर्देश देत पंचायत समित्यांना काटेकोर नियोजन करण्यास सांगण्यात आले. लेन्टर स्तरावरील घरकुले तातडीने पूर्ण करण्यास गती देण्याचे आदेश देण्यात आले.टप्पा-२ अंतर्गत पहिला हप्ता एका महिन्यात वितरित करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून जागा नसलेल्या लाभार्थ्यांच्या प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच प्रलंबित अतिक्रमण प्रकरणे निकाली काढणे, सूर्यघर योजनेंतर्गत सोलर पॅनल बसविणे आणि ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांनी दररोज किमान दहा घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यास सांगण्यात आले. चिखलदरा पंचायत समितीच्या उत्कृष्ट कामगिरीचे यावेळी कौतुक करण्यात आले.

# अमरावती विभागाचा निकाल घसरला

## ९०.५० टक्के उत्तीर्णता, राज्यात सहावा क्रमांक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आला. अमरावती विभागाचा निकाल ९०.५० टक्के लागला आहे. नऊ विभागीय मंडळांमध्ये गेल्या वर्षी ९२.९५ टक्के निकालासह अमरावती विभाग राज्यात सहाव्या स्थानी होता. यावेळी क्रमवारीत सहाव्या स्थान कायम असले, तरी निकालात गेल्या वर्षीच्या तुलनेत २.४५ टक्क्यांची घट झाली आहे.अमरावती विभागातून एकूण १ लाख ६१



हजार ७१९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. प्रत्यक्ष परीक्षेला १ लाख ६० हजार ०३७ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी १ लाख ४४ हजार ८३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. अमरावती विभागाची उत्तीर्णतेची टक्केवारी ही ९०.५० आहे.विभागात निकालाच्या टक्केवारीत बुलढाणा जिल्हा अव्वलस्थानी आहे. बुलढाणा जिल्ह्याचा निकाल ९३.९५ टक्के इतका आहे. क्रमवारी नुसार दुसरे स्थान अकोला ९०.७४ टक्के, अमरावती ९०.०६ टक्के, यवतमाळ ८८.३८ आणि वाशीम जिल्ह्याचा निकाल सर्वात कमी म्हणजे ८८.०४ टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे

**जिल्हानिहाय निकाल**

| | |
|---|---|
| बुलढाणा – | ९३.९५ टक्के |
| अकोला – | ९०.७४ टक्के |
| अमरावती – | ९०.०६ टक्के |
| यवतमाळ – | ८८.३८ टक्के |
| वाशीम – | ८८.०४ टक्के |

यंदाही मुलींनी निकालात मुलांपेक्षा सरस असल्याचे दाखवून दिले आहे. मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ही ९४.०४ टक्के तर मुलांची ८७.३५ टक्के आहे. विभागातून ८५ हजार ३६९ मुलांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी ७४ हजार ५७८ मुले, तर ७४ हजार ६६८ मुलींपैकी ७० हजार २५७ मुली उत्तीर्ण झाल्या.

अमरावती विभागात उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थ्यांपैकी प्रावीण्यासह प्रथम श्रेणी म्हणजे ७५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४१ हजार १४९ इतकी आहे. प्रथम श्रेणी म्हणज ६० टक्क्यांच्या पुढे गुण मिळवणारे ४८ हजार ७७४ विद्यार्थी आहेत. द्वितीय श्रेणी म्हणजे ४५ टक्क्यांच्या पुढे गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४८ हजार ०१४ तसेच ४५ टक्क्यांच्या वर गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४२ हजार ००२ आणि ३५ टक्क्यांच्या वर गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १३ हजार ६७० इतकी आहे.

# पेट्रोल पंपापासून अवघ्या १० मीटरवर भीषण आग

## अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला



### जयस्तंभ चौकातील खंडेलवाल ज्वेलर्सच्या इमारतीला आग, आठ बंबांच्या मदतीने आटोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती**,शहरातील अत्यंत गजबजलेल्या जयस्तंभ चौक परिसरात गुरुवारी दुपारी खंडेलवाल ज्वेलर्सच्या इमारतीला भीषण आग लागल्याने काही काळासाठी परिसरात एकच खळबळ उडाली. विशेष म्हणजे ही इमारत पेट्रोल पंपापासून अवघ्या दहा मीटर अंतरावर असल्याने मोठा अनर्थ होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग वेळीच नियंत्रणात आणण्यात यश आले आणि संभाव्य दुर्घटना टळली .मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास खंडेलवाल ज्वेलर्सच्या इमारतीच्या वरच्या मजल्यातून अचानक धूर निघताना दिसला. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण परिसर धुराच्या लोटांनी व्यापला गेला. घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या आठ गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी चारही बाजूंनी पाण्याचा मारा करत शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली.आग लागलेल्या ठिकाणाच्या अगदी जवळ पेट्रोल पंप असल्यामुळे प्रशासन आणि पोलिसांची मोठी धावपळ उडाली होती. आगीच्या ज्वाळा पेट्रोल पंपापर्यंत पोहोचल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने परिसरातील वाहतूक वळवली तसेच नागरिकांना सुरक्षित अंतरावर हटविण्यात आले.या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी वरच्या मजल्यावरील फर्निचर, महत्त्वाची कागदपत्रे आणि इतर साहित्य जळून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.दरम्यान, शहरात वाढत्या आगीच्या घटनांबाबतही चिंता व्यक्त होत आहे. महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या माहितीनुसार जानेवारी २०२५ ते मार्च २०२६ या १५ महिन्यांच्या कालावधीत शहर व परिसरात एकूण ७०४ आगीच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यात आले आहे. यामध्ये मार्च महिन्यात सर्वाधिक घटना नोंदल्या गेल्या. मार्च २०२५ मध्ये १३१ तर मार्च २०२६ मध्ये १३९ आगीच्या घटना घडल्या आहेत.शहराचे वाढते कार्यक्षेत्र लक्षात घेता महापालिकेने ट्रान्सपोर्टनगर, प्रशांतनगर आणि बडनेरा येथे अग्निशमन उपकेंद्रे सुरू केली असून, या ठिकाणी २४ तास पाण्याचे टँकर सज्ज ठेवण्यात येतात. गुरुवारी घडलेल्या घटनेतही अग्निशमन दलाच्या जलद प्रतिसादामुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# राजकमल उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामावर काँग्रेस संतापली

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची भेट घेऊन व्यक्त केली नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती–**

शहरातील रेल्वे स्टेशन ते राजकमल चौक दरम्यानचा उड्डाणपूल गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी, अपघात आणि दळणवळणाच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या शिष्टमंडळाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची भेट घेऊन निवेदन सादर करत तीव्र नाराजी व्यक्त केली.शिष्टमंडळाने उड्डाणपूल बंद असल्यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाल्याचे सांगत प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याचा



आरोप केला. पुलाच्या कामाचे नियोजन आणि वेळापत्रक सामान्य नागरिकांपासून गुप्त ठेवण्यात येत असल्याबाबतही संताप व्यक्त करण्यात आला.यावेळी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या उड्डाणपुलासाठी सुमारे १२५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून रेल्वे विभागाच्या हद्दीतील पाडकाम प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र राज्य शासनाच्या अखत्यारितील पुलाच्या चारही बाजूंच्या विंग भागाचे पाडकाम अद्याप सुरू झालेले नाही. तसेच त्या कामासाठी निविदा प्रक्रियाही पूर्ण झालेली नसल्याचे समोर आले. यावर काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.कार्यकारी अभियंत्यांनी पुलाचे संपूर्ण काम पूर्ण होण्यासाठी अजून सुमारे तीन वर्षांचा कालावधी लागणार असल्याची माहिती दिली. ही बाब समोर येताच शिष्टमंडळाने प्रशासनाच्या संथ गतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.दरम्यान, इर्विन चौकातील वाढत्या वाहतूक कोंडीचाही मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. डॉ. पंजाबराव देशमुख बँकेसमोरील बंद करण्यात आलेला डिव्हायडर तात्काळ सुरू करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. यावर कार्यकारी अभियंत्यांनी सकारात्मक भूमिका घेत रोड सुरक्षा समितीकडे प्रस्ताव पाठविण्याचे आश्वासन दिले. तसेच मनपाचा संबंधित ठरावही प्रस्तावासोबत जोडण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.उड्डाणपुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणी काँग्रेस शिष्टमंडळाने केली.यावेळी काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत, मनपा विरोधी पक्षनेते विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, संजय वाघ, संजय शिरभाते, सुरेश रतावा, नितीन काळे, विक्की वानखडे, अनिकेत ढेंगळे, अक्षय नरगडे, बिलाल भाई, विजय अटळकर आदी उपस्थित होते.

# खामगावात मध्यरात्री राडा!

## क्षुल्लक कारणावरून दोन गट भिडले

### दगडफेकीमुळे परिसरात भीतीचे वातावरण; परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८खामगाव** बुलढाणा जिल्ह्याची औद्योगिक व व्यावसायिक राजधानी ही खामगाव शहराची ओळख. मात्र हेच शहर सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या अतिसंवेदनशील म्हणून ओळखले जाते. या शहराला धार्मिक, जातीय दंगलीचा देखील काळा इतिहास आहे. क्षुल्लक कारणावरून दोन गट एकमेकांसमोर उभे ठाकतात आणि दगडफेक, होऊन संघर्ष पेटतो. खामगांव शहरात नियमित अंतराने असा संघर्ष होतात.

खामगाव शहरात काल गुरुवारी रात्री पावणे अकरा वाजताच्या सुमारास दोन गटात असाच वाद पाहावयास मिळाला. शहरातील संवेदनशील आणि कुख्यात मस्तान चौक, निर्मल टर्निंग पॉईंट परिसरात दोन गट आमनेसामने आले. क्षुल्लक



कारणावरून वाद झाला. वादाचे रूपांतर वादंगात होऊन दोनही बाजूने एकमेकांवर दगडफेक करण्यात आली.या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून भीतीचे वातावरण पसरले होते.माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार रामकृष्ण पवार यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी ( खामगाव ) प्रदीप पाटील हे देखील घटनास्थळी दाखल झाले आहेत. परिसरात जमलेल्या जमावाला पांगवून परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. अतिरिक्त पोलीस कुमक पाचरण करून मस्तान चौक, निर्मल पॉईंट परिसरात तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला.

दरम्यान परिस्थिती नियंत्रणात असली तरी परिसरातील तणाव आज शुक्रवारी देखील कायम असल्याचे चित्र आहे. खबरदारीचा उपाय म्हणून आजही मस्तान चौक परिसरात तगडा पोलीस बंदोबस्त कायम आहे. आजूबाजूच्या भागात देखील बंदोबस्त लावण्यात आल्याने परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप आले आहे. पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनात पोलीस अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. दरम्यान नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि शांतता राखावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने अतिरिक्त पोलीस अधीक्षक ( खामगाव ) श्रेणिक लोढा व उप विभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांनी केले आहे.

# अमरावती जिल्ह्यात आरटीईचे १ हजार ९१८ प्रवेश निश्चित

## अद्याप ६६८ जागा रिक्त; पालकांना प्रवेश प्रक्रियेचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.८अमरावती :** शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत यंदाची प्रवेश प्रक्रिया प्रथमच वेळेत सुरू झाल्याने पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. अमरावती जिल्ह्यात आरटीई अंतर्गत एकूण २ हजार ५८६ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असून आतापर्यंत १ हजार ९१८ विद्यार्थ्यांचे प्रवेश संबंधित शाळांमध्ये निश्चित झाले आहेत. मात्र अद्याप ६६८ जागा रिक्त असल्याने पात्र पालकांनी तत्काळ प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.जिल्ह्यातील २२७ इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश दिले जात आहेत. यासाठी तब्बल ७ हजार ९६० विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले होते.




पुणे येथे संगणकीय ऑनलाईन सोडत काढण्यात आली असून त्यामध्ये २ हजार ६२६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. तितक्याच विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादीही तयार करण्यात आली आहे.निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी १० एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती आणि त्यानंतर प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली. सुरुवातीला कागदपत्र पडताळणी व प्रवेश निश्चितीची अंतिम मुदत २० एप्रिल होती. त्यानंतर २१ ते ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. आता पुन्हा एकदा प्रवेश प्रक्रियेसाठी अतिरिक्त वेळ देण्यात आल्याने ज्या पालकांनी अद्याप कागदपत्रे सादर केलेली नाहीत किंवा प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांना दिलासा मिळाला आहे.आरटीई प्रवेश पोर्टलवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा या उद्देशाने शासनाकडून ही मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकारी संगीता सोनोने यांनी दिली.

# अमरावतीच्या राज्य सेवाहक्क आयुक्तपदी अरुण डोंगरे यांची नियुक्ती

## मंगळवारी मुंबई येथे पद व गोपनीयतेची शपथ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती**

राज्य सेवाहक्क आयोगाच्या अमरावती विभागाचे आयुक्त म्हणून म्हाडाचे सेवानिवृत्त मुख्य अधिकारी तथा वरिष्ठ सनदी अधिकारी अरुण डोंगरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.राज्य सेवाहक्क आयुक्त म्हणून राज्यपालांच्या वतीने आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव मंगळवार दिनांक १२ मे रोजी राज्य सेवाहक्क आयुक्त म्हणून त्यांना पद व गोपनीयतेची शपथ देणार आहेत.मुंबई येथील म्हाडाच्या बिल्डिंग रिपेअर अँड री कन्स्ट्रक्शन बोर्डाचे मुख्य अधिकारी म्हणून अरुण डोंगरे हे सेवानिवृत्त झाल्यानंतर शासनाने त्यांची सेवाहक्क आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. शासकीय सेवेत सर्वसामान्य जनतेला न्याय मिळावा या सामाजिक बांधीलकीने त्यांनी काम केले असून, शासकीय सेवेची सुरुवात उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मंगरूळपीर येथून झाली आहे. अमरावती विभागात मूर्तिजापूर, दारव्हा, अचलपूर येथे उपविभागीय अधिकारी म्हणून काम केल्यानंतर अतिरिक्त जिल्हाधिकारी अमरावती तसेच महसूल उपायुक्त अमरावती व नागपूर या पदावरही काम केले आहे.

अमरावती महापालिका आयुक्त म्हणून शहराच्या सर्वांगीण विकासासोबतच ऑनलाइन इमारत परवाना पद्धत लागू केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला घर बांधणीसाठी सुलभपणे परवानगी मिळत आहे.सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असताना स्वच्छ



भारत अभियानात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अभिनेते अभिताभ बच्चन यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला होता.

यशवंत पंचायतराज अभियानातही त्यांना राज्यात द्वितीय क्रमांक मिळाला आहे. नांदेडचे जिल्हाधिकारी या पदावर काम करताना जलयुक्त शिवार ही योजना अत्यंत प्रभावीपणे राबवली. या योजनेचा राज्यस्तरावर गौरव करण्यात आला. शिर्डी येथील साईबाबा संस्थानचे मुख्य कार्याधिकारी तसेच शासनाच्या विविध विभागात त्यांनी यशस्वीपणे सेवा दिली आहे. मुंबई येथील म्हाडामध्ये मुख्याधिकारी असताना इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना त्यांचा हक्क अबाधित राहावा, त्यांना वेळेत भाडे मिळावे व इमारतीचे नियोजित वेळेत बांधकाम करून पुनर्वसन करण्यासंदर्भातील महत्त्वपूर्ण शासन निर्णय त्यांच्या कार्यकाळात निर्गमित करण्यात आला. त्यांच्या प्रभावी व उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन शासनाने त्यांची अमरावतीचे राज्य सेवाहक्क आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे.

# महापौरांच्या जीवाला धोका ! धमकी मिळाल्याचे वृत्त, सुरक्षेची खबरदारी

## महापौर तेजवानींना २ सशस्त्र पोलिसांचे संरक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती**, शहराचे प्रथम नागरिक, महापौर श्रीचंद तेजवानी यांना धमकी मिळाल्याचे वृत्त आहे. परिणामी, गुरुवारपासून त्यांना दोन सशत्र पोलीस संरक्षण पुरवण्यात आले आहे. शहराचे प्रथम नागरिक असल्यामुळे त्यांना राज्यमंत्र्यांचा दर्जा देण्यात आल्याचेही वृत्त आहे. चार वर्षांनंतर महानगरपालिका निवडणुका पार पडल्यानंतर आता जनतेचे राज्य सुरू झाले आहे. सर्व पोलीस ठाण्यांकडून मिळालेल्या ताज्या गुप्त माहितीच्या आधारे, महापौरांच्या जीवाला असलेल्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर त्यांना सुरक्षा पुरवण्यात आली आहे.गुरुवारी, महापौर श्रीचंद तेजवानी नेहमीप्रमाणे त्यांच्यासोबत अचानक सशस्त्र पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले. यामुळे महानगरपालिकेत जोरदारचर्चा सुरूझाली. महापौरांना अचानक सुरक्षा का पुरवण्यात आली? महापौरांनी स्वतः सुरक्षेची विनंती



केली होती की त्यांना इतर कोणत्या कारणास्तव सुरक्षा देण्यात आली ? महानगरपालिकेत अशा विविध चर्चा सुरू होत्या.जेव्हा गुप्तचर विभागाला याबद्दल विचारले असता, त्यांनी सांगितले की, व्हीआयपी राजकीय नेत्यांना गुप्तचर विभागाच्या अहवालाची सखोल चौकशी केल्यानंतरच सुरक्षा पुरवली जाते. त्यामुळे, केवळ अशाच व्यक्तींना सुरक्षा पुरवली जाते, ज्यांच्या जीवाला धोका आहे किवा असण्याची शक्यता आहे आणि हेच लक्षात घेऊन ही सुरक्षा पुरवण्यात आली आहे. गुरुवारपासून बंदूकधारी पोलीस अधिकारी महापौरांना २४ तास सुरक्षा पुरवणार आहे.–